# ई - पोलीस पत्रिका

दि. २६/०६/२०२४ अनु.क्र.११४

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**०१.पोआअ/पशा-३/प्र.कार्यासन बदली/कन्नुरकर/५७४४/२०२४ अमरावती शहर दिनांक २९/०५/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील कार्यरत खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यासनावर नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मंत्रालयीन कर्मचारी नाव व पदनाम | तत्कालीन नियुक्ती कार्यासन | नविन नेमणुकीचे कार्यासन |
|---|---|---|---|
| 01 | श्रीमती अल्पना कन्नुरकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक | पोलीस कल्याण निधी लिपीक, लेखा शाखा | प्रबंधक सहायक लिपीक |

उपरोक्त नमुद लिपीक यांनी तात्काळ आपले नविन नेमणुकीचे ठिकाणी हजर व्हावे.

## रजा

**०१.पोआअ/आस्था-५/सिक अहवाल/५६८४/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/०६/२०२४**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा खालील नमुद रुग्णनिवेदन कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/२१७, रफिक खान | पोलीस मुख्या | दि.१३/०५/२०२४ ते दि.३०/०५/२०२४ पर्यत १८ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| २ | मपोशि/२२६, पल्लवी कोलकर | महिला सेल | दि.२७/०५/२०२४ ते दि.१०/०६/२०२४ पर्यत १५ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ३ | श्रेपोउपनि/७२४, सुशिल कुमार चोर | शवाशा पुर्व | दि.०९/०५/२०२४ ते दि.१६/०५/२०२४ पर्यत ०८ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ४ | मपोशि/७२७, प्रियंका जवळकर | महिला सेल | दि.०२/०५/२०२४ ते दि.२४/०५/२०२४ पर्यत २३ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ५ | पोहवा/४६५, राजेश आगरकर | श्वान पथक | दि.०६/०५/२०२४ ते दि.२२/०५/२०२४ पर्यत १७ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ६ | मपोशि/६३२, रेश्मा टांगले | महिला सेल | दि.१३/०३/२०२४ ते दि.१८/०३/२०२४ पर्यत ०६ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ७ | सपोउपनि/१५०६, हेमंत वाकोडे | पोलीस मुख्या. | दि.०६/०५/२०२४ ते दि.३०/०५/२०२४ पर्यत २५दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ८ | पोहवा/३९३, | राजापेठ | दि.०८/०५/२०२४ ते दि.२०/०५/२०२४ | नियम ६१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विनोद माहोरे | | पर्यत १३ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नुसार |
| ९ | सपोउपनि/४१७,<br>गजानन दुबे | मोपवि | दि.२६/०२/२०२४ ते दि.०१/०४/२०२४<br>पर्यत ३६ दिवस अर्जित रजा मंजुर | नियम ५०<br>नुसार |
| १० | पोशि/४७३,<br>विजय जवरे | ज.प्र.पथक | दि.१७/०४/२०२४ ते दि.०४/०५/२०२४<br>पर्यत १८ दिवस अर्जित रजा मंजुर | नियम ५०<br>नुसार |

तसेच वर नमुद अमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहिती देऊन आपल्या येथील सिक रजिस्टर मध्ये तशी नोंद करण्यात यावी.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअश/विचौ-१/निलंबन पोउपनि श्री.केवटी + २/५८०६/२०२४ अमरावती शहर दि.२१/०६/२०२४**

### निलंबन आदेश

१. ज्या अर्थी तुम्ही१) श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक २) पोशि/५७४ महेश मोहन शर्मा ३) मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले,सर्व नेमणूक - पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक१५/०६/२०२४ रोजी अर्जदारश्रीमती शितल चंद्रबहादूर थापा वय ३० वर्ष रा.नेपाळ, ह.मु. कठोरा नाका, अमरावती यांनी दिलेल्या तक्रार अर्जामध्ये नमूद १ ते ३ पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी पो.स्टे. ला चौकशी कामी आणून विचारपूस करुन मारहाण केल्या बाबत आरोप केल्या बाबतचा तक्रार अर्जाचे अनुषंगाने तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केली आहे.

१) तुम्ही दखलपात्र गुन्हया बाबत उपरोक्त अर्जदार यांच्या प्राप्त अर्जावर कायदेशिर पध्दतीचा अवलंब करणे,तसेच गुन्हा नोंद करुन तपास करणे गरजेचे होते, तथापि तसे न करता सदर बाब दुर्लक्षीत केल्याचे दिसुन आले आहे.

२) पोलीस स्टेशनला कोणताही गुन्हा दाखल नसतांना फक्त तक्रार अर्जावर गैरअर्जदार महिलेला गाडी मध्ये बसवुन चौकशी करीता पोलीस स्टेशनला आणुन बसवुन ठेवले. तसेच गैरअर्जदार यांना कोणतीही नोटीस न देता पोलीस स्टेशनला चौकशीकरीता आणले, ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

३) दिनांक ९.६.२०२४ रोजी गैरअर्जदार महिलेला पोलीस स्टेशला विचारपुस करण्या करीता आणल्या नंतर त्याची रितसर स्टेशन डायरीला नोंद घेणे आवश्यक होते, तथापी स्टेशन डायरीला नोंद घेण्यात आली नाही. परंतु गैरअर्जदार महिलेला चौकशी केल्या नंतर तिला तीचे पतीसह पोलीस स्टेशन मधुन परत पाठवितांना दि.९.६.२०२४ रोजी सायंकाळी १८.५७ मिनिटांनी अर्जदार सातपुते यांचे घरातील मंगळसुत्र चोरी गेल्याबाबत चौकशी केल्या बाबतची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात आली आहे.

२. श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पोशि/५७४ महेश मोहन शर्मा, मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले, सर्व नेमणुक पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर यांनी उपरोक्त नमुद केल्या

प्रमाणे प्रस्तुत प्रकरणा मध्ये कायदेशिर तरतुदीचा अवलंब करुन कार्यवाही केली नाही. त्यांनी त्यांचे कर्तव्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केला आहे.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीस कायदा १९५१ मधीलकलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका 1991 मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदी नुसार आदेशाच्या दिनांका पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतील तो पर्यंत श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पोशि/५७४ महेश मोहन शर्मा व मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले,यांचे मुख्यालय, पोलीस मुख्यालय,अमरावती शहरहे राहील. निलंबन काळात त्यांना दररोज आपल्या मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय त्यांनी मुख्यालय सोडल्यास ती त्यांची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरीकरता येणार नाही. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास आपणा विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

**भाग-३**

**वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण**

**निरंक**

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस